असा. क्र. ३६अ

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

रविवार, मे १, १९९४/वैशाख ११, शके १९१६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

---

महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय

राजभवन, मुंबई ४०० ०३५, दिनांक ३० एप्रिल १९९४

### आदेश

क्रमांक जीएस/जी/९४,डीबी/४३२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१ द्वारे भारताच्या राष्ट्रपतींनी काढलेला महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, मी, पी. सी. अलेक्झांडर, महाराष्ट्राचा राज्यपाल, पुढीलप्रमाणे आदेश काढीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या आदेशात विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, १९९४ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्यपालांनी, **शासकीय राजपत्रातील** आदेशाद्वारे नेमून दिलेल्या दिनांकास अंमलात येईल.

(३) जोपर्यंत महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४ अंमलात राहील, त्या तारखेपर्यंत व ती तारीख धरून तो अंमलात राहील.

२. **विकास मंडळांची स्थापना.**—महाराष्ट्राचे राज्यपाल, या बाबतीत काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे, महाराष्ट्र राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी प्रत्येकी एक स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करतील. ही मंडळे अनुक्रमे पुढीलप्रमाणे ओळखली जातील :—

(अ) विदर्भ विकास मंडळ,
(ब) मराठवाडा विकास मंडळ,
(क) उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळ.

३. **विकास मंडळांची कार्यक्षेत्रे.**—या मंडळांची कार्यक्षेत्रे यांत, पुढे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील :—

(अ) विदर्भ विकास मंडळाच्या अधिकाराखाली नागपूर आणि अमरावती महसूल विभागांचा समावेश असेल.

(ख) मराठवाडा विकास मंडळाच्या अधिकाराखाली औरंगाबाद महसूल विभागांचे क्षेत्र राहील.

(क) उर्वरित महाराष्ट्रासाठीच्या विकास मंडळाच्या अधिकाराखाली कोकण, पुणे आणि नाशिक महसूल विभागांचे क्षेत्र राहील.

४. **विकास मंडळांची रचना.**—(१) प्रत्येक विकास मंडळामध्ये अध्यक्ष धरून जास्तीत जास्त ७ सदस्य असतील आणि त्यांची नियुक्ती राज्यपालांकडून करण्यात येईल :—

(अ) संबंधित विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रामधून महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील एक दोन सदस्य ;

(ब) संबंधित विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणामधून एक सदस्य ;

(क) ज्यांना—

(एक) नियोजन प्रक्रिया, शासकीय वित्त व्यवस्था व लेखे यांमधील विशेष ज्ञान असेल; किंवा

(दोन) वित्तीय व प्रशासकीय बाबींचा व्यापक अनुभव असेल; किंवा

(तीन) पाटबंधारे, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, उद्योग, कृषि, शिक्षण किंवा सेवायोजन यांसारख्या विविध क्षेत्रांतील विशेष ज्ञान असेल, अशा व्यक्तींमधील तीन पाँच तज्ज्ञ व्यक्ती ;

(ड) संबंधित विकास मंडळाच्या क्षेत्रातील महसूल विभागाचे सर्व आयुक्त ;

(इ) संबंधित विकास मंडळाच्या क्षेत्रातील महसूल विभागाच्या अतिरिक्त आयुक्ताच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा, राज्य शासनाचा अधिकारी.

(२) खंड (१) च्या उप खंड (इ) मध्ये निर्दिष्ट केलेला अधिकारी हा प्रत्येक संबंधित विकास मंडळाचा सदस्य-सचिव असेल.

५. **अध्यक्ष आणि सदस्यांचा पदावधी आणि त्यांना देय असलेले भत्ते.**—(१) अध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी, त्यांच्या नियुक्तीच्या वेळी राज्यपाल विनिर्दिष्ट करतील, त्याप्रमाणे राहील. राज्यपाल, अध्यक्षांसह कोणत्याही सदस्याची नियुक्ती, त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी रद्द करू शकतील किंवा यथास्थिती, मंडळाची मुदत पूर्ण होण्यापूर्वी, मंडळाची पुनर्रचना करू शकतील.

(२) अध्यक्ष आणि खंड ४ च्या उप खंड (१) मधील परिच्छेद (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्य हे सदस्य असतील आणि ज्या प्रवर्गामधून तो सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आला असेल त्या प्रवर्गाचा सदस्य असल्याचे तो बंद झाल्याबरोबर, तो असा सदस्य किंवा यथास्थिति, अध्यक्ष असण्याचे बंद होईल.

(३) खंड ४ च्या उप खंड (१) च्या परिच्छेद (ड) व (इ) मध्ये निर्देशिलेल्या सदस्यांव्यतिरिक्त, अध्यक्षांसह कोणत्याही सदस्यास कोणत्याही क्षणी आपल्या पदाचा लेखी राजीनामा स्वतःच्या सहीने राज्यपालांकडे देता येईल आणि ज्या दिवसापासून त्याचा राजीनामा राज्यपालांकडून स्वीकृत करण्यात येईल त्या दिवसापासून तो पदमुक्त झाल्याचे मानण्यात येईल.

(४) अध्यक्षाला आणि सदस्यांना विकास मंडळाच्या बैठकींना हजर राहण्यासाठी आणि विकास मंडळाची इतर कोणतीही कामे करण्यासाठी राज्यपाल, वेळोवेळी ठरवून देतील अशी फी व भत्ते आणि खंड ४ च्या उप खंड (१) च्या परिच्छेद (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्याला फी व भत्ते व्यतिरिक्त राज्यपाल वेळोवेळी ठरवून देतील असे मानधन देण्यात येईल.

स्थानीक सदस्य

amendment is on page 179 and 183

(५) कार्यकारी अध्यक्ष राज्य नियोजन मंडळ पदसिद्ध सदस्य. दि. १०/५/२००१

६. **विकास मंडळाची कार्ये.**—विकास मंडळ, वेळोवेळी—

(अ) संपूर्ण राज्यातील विकासाच्या पातळयांच्या तुलनेत योग्य निर्देशांकाच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रांची विकासाची सापेक्ष पातळी निश्चित करणे ;

(ब) मंडळाच्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील विकासाचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामांचे मूल्यमापन करणे ;

(क) वार्षिक, तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात विकास मंडळांच्या क्षेत्रावरील विकास खर्चाच्या पातळ्या सुचविणे; आणि

(ड) मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करणे व तो महाराष्ट्र राज्य विधानमंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यावर व्यवहार्य असेल तेथवर ३ महिन्यांच्या कालावधीत राज्यपालांना सादर करणे.

७. **विकास खर्चासाठी निधीचे वाटप.**—एकूण राज्याची गरज विचारात घेऊन विकास मंडळाच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल समन्यायाने निधीचे वाटप व्हावे याची खातर जमा करतील.

(२) निधीचे समन्यायाने वाटप होईल याची खातर जमा करताना राज्यपाल—

(अ) विकास मंडळाने कोणत्याही शिफारशी केल्या असल्यास त्या विचारात घेतील, आणि

(ब) निधीच्या वाटपाच्या बाबतीत, राज्यपाल त्यांना आवश्यक आणि योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीचा किंवा व्यक्तिसंघाचा सल्ला घेऊ शकतील.

८. **वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये, निधीच्या वाटपाचा निर्देश करणे.**—निधी किंवा नियतव्यय यांच्या, राज्यपालांनी ठरवून दिलेल्या वाटपाचा राज्य विधिमंडळापुढे सादर करावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निर्देश करण्यात येईल आणि उपरोक्त नियतव्ययाशी संबंधित विकास कार्ये राज्य शासनाकडून पूर्ण करण्यात येतील, वा पूर्ण करून घेण्यात येतील आणि अशा प्रकारे देण्यात आलेला निधी हा एका मंडळाच्या कार्यक्षेत्रामधून दुसऱ्या मंडळाच्या कार्यक्षेत्राकडे वळवता येणार नाही :

परंतु—

(अ) एखाद्या मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये पूर्वोक्तानुसार हाती घेण्यात आलेल्या विकास कार्याच्या बाबतीत, अर्थसंकल्पीय नियम व कार्यपद्धतीला अनुरूप असे पुनर्विनियोजन करता येईल;

(ब) विकास कार्याची अंमलबजावणी करताना सध्याचे मापदंडच लागू राहतील ; आणि

(क) विकास कार्यावर संबंधित प्रशासकीय विभागांचे प्रशासकीय व तांत्रिक पर्यवेक्षण, तसेच नियंत्रण सध्याप्रमाणे चालू राहील.

९. **राज्यपालांकडून निदेश.**—विकास मंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात राज्यपाल, विकास मंडळाला वेळोवेळी, आदेशाद्वारे, निदेश देऊ शकतील.

१०. **शिक्षण, प्रशिक्षण आणि सेवायोजन यांसाठी सुयोग्य व्यवस्था.**—सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्यायी व्यवस्था करण्याची राज्यपाल खातरजमा करतील आणि त्यासाठी राज्यपाल, वेळोवेळी, राज्य शासनास योग्य ते निदेश देतील ; आणि असे करीत असताना, आवश्यक आणि योग्य वाटल्यास, राज्यपाल, कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा व्यक्तिसंघाचा या बाबतीत सल्ला घेऊ शकतील.

११. **नियम.**—संविधानांच्या अनुच्छेद ३७१, खंड (२) खालील राज्यपालांच्या कर्तव्यांच्या संबंधातील कामकाज योग्य रीत्या पार पाडण्यासाठी आणि या आदेशातील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यपाल, वेळोवेळी, त्यांना आवश्यक वाटतील असे नियम आदेशाद्वारे तयार करतील.

सही

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

राज भवन, मलबार हिल,
मुंबई ४०० ०३५.
दिनांक ३० एप्रिल १९९४.

---

**राज्यपालांचे सचिवालय**
राज भवन, मलबार हिल,
मुंबई ४०० ०३५.
दिनांक ३० एप्रिल १९९४.

**आदेश**

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळे आदेश, १९९४.

क्रमांक जीएसए/९४/डीबी/४३३.—विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळे आदेश, १९९४ याच्या खंड १, उपखंड (२) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, दिनांक १ मे १९९४ हा दिनांक उक्त आदेश अंमलात येण्याचा दिनांक म्हणून नियत करीत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही

**सतीश त्रिपाठी,**
राज्यपालांचे सचिव,

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.**

क्रमांक:- मवैमं-१०९९/प्र.८२/का.१४५२.
**महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २१ जुलै १९९९.

प्रति

(१) अपर आयुक्त व सदस्य सचिव,
विदर्भ विकास मंडळ, नागपूर.

(२) अपर आयुक्त व सदस्य सचिव,
मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद.

(३) सदस्य सचिव,
उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई.

विषय:- मंडळाकडील वाहनांच्या वापराबाबत...

महोदय,

शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक: वैविमं-१०९४/प्र.क्र.६३/का.१४५२, दिनांक-६.७.१९९४ अन्वये मंडळाचे अध्यक्ष व सदस्य सचिवांकरिता प्रत्येकी एक वाहन मंजूर करण्यात आले आहे. शासन निर्णय नियोजन विभाग क्र. वैविमं-१०९५/प्र.१८५/का.१४५२, दि. २५.६.१९९६ अन्वये मंडळाच्या कामकाजासाठी आणखी एक वाहन मंजूर करण्यात आले आहे. मा.राज्यपालांनी सूचित केल्यानुसार मंडळाच्या अशासकीय तज्ञ सदस्यांच्या वापरासाठी हे अतिरिक्त वाहन मंजूर करण्यात आलेले आहे. त्यामुळे या तिन्ही वाहनांचा वापर कोणी करावा याबाबत स्पष्टता आहे. तरी त्यानुसारच वाहनांचा वापर करण्यात यावा.

मा.अध्यक्षांसाठी उपलब्ध असलेले वाहन दुरुस्ती वा अन्य कारणामुळे ज्यावेळी वापरणे शक्य नसेल अशा वेळी त्यांच्यासाठी संबंधित जिल्हाधिका-यांकडे डीव्ही कारची मागणी करावी. (अध्यक्षांना मंत्रीपदाचा दर्जा असल्याने) व जिल्हाधिकारी यांनी अध्यक्षांना त्याप्रमाणे गाडी उपलब्ध करुन द्यावी.

आपला,

( रा.शं.कुलकर्णी )
सह सचिव

AUG 1999

प्रत माहितीस्तव-

मा.राज्यपालांचे उप सचिव (वैविमं), राजभवन, मलबार हिल, मुंबई यांना त्यांचे पत्र क्र.जीएस/डीएस/डीबी/एफ-७/९९/७५२, दि. २३.४.१९९९ च्या संदर्भात सादर.

(1)

राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय

वैधानिक विदर्भ विकास मंडळ
नागपूर
आवक क्र. 136
तारीख 30 JAN 1995
सदस्य सचिव सहसंचालक
अध्यक्ष

क्रमांक रा.स./उ.स./वैविमं/प्र.क्र.६/
दैनिक भत्ते इ./९५/३०५

राजभवन
मलबार हिल, मुंबई ४०० ०३५
~~भाषांतर विभाग मुंबई ४११ ००५/नागपूर~~

दिनांक २१ जानेवारी, १९९५

प्रति,
सदस्य सचिव,
विदर्भ वैधानिक विकास मंडळ,
नागपूर – ४४० ०२२. यांस,

विषय :– विकास नियोजन विचार बैठकीस उपस्थित राहणाऱ्या अशासकिय सदस्यांना द्यावयाचा प्रवास व दैनिक भत्त्यासंबंधात.

महोदय,

सह–सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ह्यांचे अ.शा. पत्र क्र. वैविमं–१०९४/सीआर–१४०/का–१४५२ दि. १३.१.१९९५ अन्वये मला असे कळविण्याचे आदेश आहेत की, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. आर.पी.एस.–१२८८/५६८/एस.एस. ई.आर.–१० दि. ३.१०.१९८८ प्रमाणे रु. ५१००/– आणि त्याहून जास्त वेतन असणाऱ्या राज्य शासनाच्या प्रथम दर्जाच्या अधिकाऱ्याप्रमाणे प्रवासभत्ता व दैनिकभत्ता, मंडळाच्या अशासकिय सदस्यांना मंजूर करण्यात आला आहे. या संदर्भात एक विशेष बाब म्हणून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळे [illegible] खंड ४(क) प्रमाणे नियुक्त केलेल्या अशासकिय सदस्यांना विकास मंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात विमान प्रवास किंवा रेल्वेच्या वातानुकूलित प्रथम वर्गाने प्रवास करण्याची सुभा देण्यात आलेली आहे. यावरील होणारा खर्च संबंधीत मंडळाच्या मंजूर अनुदानातून भागवावयाचा आहे.

आपला,

( वसंत राठी )

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

असा. क्र. ४६

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, जून २५, १९९४/आषाढ ४, शके १९१६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

---

### OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA

Raj Bhavan, Bombay 400 035, dated the 25th June 1994

**Order**

No. GSA/DB/94/779.—In exercise of the powers conferred by clauses 2 and 4 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Order, 1994 (hereinafter referred to as "the said Order"), I, P. C. Alexander, Governor of Maharashtra hereby—

(*a*) constitute the Vidarbha Development Board, the Marathwada Development Board and the Development Board for the rest of Maharashtra, for the areas respectively specified in sub-clauses (*a*), (*b*) and (*c*) of clause 3 of the said Order; and

(*b*) appoint the following persons to be the members (including the Chairman) of the Vidarbha Development Board, the Marathwada Development Board and the Development Board for the rest of Maharashtra, as mentioned below, respectively, namely:—

THE VIDARBHA DEVELOPMENT BOARD

| | | |
|---|---|---|
| 1. | Prof. Ram Meghe, Member, being expert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; | Chairman. |
| 2. | Shri Madhukarrao Kimmatkar, M.L.C., Member, under paragraph (*a*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; | Member. |

3. Shri Prakash Patil, President, Z.P., Chandrapur, Member, under paragraph (*b*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
4. Shri H. B. Ulemale, Member, being expert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
5. Dr. S. A. Deshpande, Member, being expert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
6. Commissioner of Nagpur Division, Member, under paragraph (*d*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
7. Shri S. S. Bhakare, I.A.S., Member-Secretary, under paragraph (*e*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order. — Member-Secretary.

## THE MARATHWADA DEVELOPMENT BOARD

1. Shri Kamalkishore Kadam, Member, being expert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Chairman.
2. Shri Raibhan Jadhav, M.L.A., Member, under paragraph (*a*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
3. Shri Jeevanrao Gore, President, Z.P., Osmanabad, Member, under paragraph (*b*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
4. Shri B. A. Kulkarni, Member, being expert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
5. Shri Gopal Vinayak Abhange, Member, being exepert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
6. Commissioner of Aurangabad Division, Member, under paragraph (*d*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
7. Shri S. L. Kulkarni, I.A.S., Member-Secretary, under paragraph (*e*) of sub-clause (1) of clause 4 of the said Odrer. — Member-Secretary.

## THE DEVELOPMENT BOARD FOR THE REST OF MAHARASHTRA

1. Shri Ram Pradhan, Member, being expert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Chirman.
2. Shri Sharad Ranpise, M.L.A., Member, under paragraph (*a*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.
3. Shri Anil Deshmukh, President, Municipal Council, Chalisgaon, Member, under paragraph (*b*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; — Member.

| | | |
|---|---|---|
| 4. | Shri M. D. Sathe, Member, being expert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; | Member. |
| 5. | Shri P. B. Patil, Member, being expert under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; | Member. |
| 6. | Commissioner of Konkan Division, Member, under paragraph (*d*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order; | Member. |
| 7. | Shri P. G. Kurse, I.A.S., Member-Secretary, under paragraph (*e*) of sub-clause (1) of clause 4 of the said Order. | Member-Secretary. |

2. The term of office of the Chairman, members of each Board shall be for a period of two years from the date of publication of this notification in the *Official Gazette*.

Raj Bhavan, Malabar Hill,
Bombay 400 035.
Dated the 25th June 1994.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Sd/—

SATISH TRIPATHI,
Secretary to Governor.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई।

असा. क्र. ४८

रजिस्टर्ड नं. एमएच/बार-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

सोमवार, जुलै ४, १९९४/आषाढ १३, शके १९१६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

---

**OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA**

Raj Bhavan, Bombay 400 035, dated the 4th July 1994

**Order**

No. GSA/94/DB/907.—In exercise of the powers conferred by clause 5 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the Rest of Maharashtra Order, 1994, I, P. C. Alexander, Governor of Maharashtra hereby make the following order with regard to the Chairman and Members (hereinafter referred to as the "Chairman" and "Members" respectively) of the Development Boards appointed by me under clause 4(1) of the said order :—

1. The Chairman of a Development Board shall have the status of a Cabinet Minister of the Government of Maharashtra and he shall be entitled to have the facilities as specified in Part-A of the Annexure to this order.

2. The members f a Development Board other than the members appointed under sub-clauses (*d*) and (*e*) shall be entitled to have the facilities as specified in Part-B of the Annexure to this order.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

Raj Bhavan,
Malabar Hill, Bombay 400 035,
Dated the 4th July 1994.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Sd/—
SATISH TRIPATHI,
Secretary to the Governor.

## *ANNEXURE*

(*See* Order No. GSA/94/DB/907, dated the 4th July 1994)

### PART-A

The Chairman of the Development Board shall be entitled to have the following facilities :—

(1) Rent-free furnished accommodation at the Headquarters of the Development Board of which he is the Chairman or, if he prefers to have his own arrangements in this regard, he shall be entitled to an allowance at the flat rate of Rs. 2,500 p.m;

(2) Provision of a chauffer-driven motor-car for official purposes and office accommodation;

(3) Telephone at residence and office;

(4) Secretarial assistance;

(5) An honorarium of Rs. 5,000 per month; and

(6) T.A. and D.A. on tour as admissible to a Minister of Cabinet rank of the Government of Maharashtra.

### PART-B

Every non-official Member of a Development Board shall be entitled to have the following facilities :—

(1) *Travelling and Daily Allowance.*—Travelling allowance and daily allowance under the Rules of travelling allowance and daily allowance as applicable to Grade-I officer of the Government of Maharashtra, in the pay range of Rs. 5,100 and above, as laid down in the Government Resolution, Finance Department, No RPS-1288/568/SER-10, dated the 3rd October 1988 and subsequently revised orders issued from time to time in this regard for journeys performed to attend meetings of a Development Board or any of its special committees or for any other meetings attended or tours performed in connection with the business of the Development Board.

(2) *Facilities during tours.*—During tours outside Headquarters of the Development Board in connection with the meetings or other business of the Development Board as also during the days on which a Member is required to stay at the Headquarters of the Development Board in connection with the meetings of the Development Board or any of its special committees, accommodation in Government inspection bungalows/rest houses on the same terms and conditions as are applicable to the reservation of accommodation for officers of Grade-I of the Government of Maharashtra.

(3) The use of transport at Government cost during tours in connection with the business of the Development Board. Where it is not possible to provide him with transport while on tour for any reason, the Member shall be reimbursed the actual cost of transportation, if any, incurred by him at the approved rates provided no travelling allowance is claimed by him for journeys so performed.

(4) *Sitting Fee.*—A sitting fee of Rs. 300 per day for each day for attending any meeting of the Board or any of its special committees officially assigned to him/her by a Development Board.

(5) *Travelling Allowance and Daily Allowance for Members of the State Legislature.*—Notwithstanding anything mentioned above, a member of a Board who is also a member of the State Legislature, shall be entitled to,—

(*a*) daily allowance at the rate admissible for the time being (for remaining present in Bombay) to members of the State Legislature, for remaining present at the Headquarters of the Development Board (in connection with the business of the Development Board), if such a member is a resident of the place where the Headquarter of the Development Board is located ;

(*b*) travelling allowance and daily allowance for any journey undertaken for attending any meeting of the Development Board or any of its special committees or for any other tour in connection with the business of the Board at the Headquarters of the Development Board or elsewhere according to the orders contained in Government Resolution, Finance Department, No. TRA. 1470/1310/ XVIII, dated the 27th January 1971.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

35

Office of the Secretary to Governor
of Maharashtra.

Raj Bhavan, Bombay-400 035, dated 4th July 1994.

## ORDER

No.:GSA/94/DB/901. In exercise of the power conferred by Clause 5 of Development Boards for Vidarbha, Marathwada and the Rest of Maharashtra. Order 1994, I P.C.Alexander, Governor of Maharashtra hereby make the following order with regard to the Chairman and Members (hereinafter referred to as the "Chairman" and "Members" respectively) of the Development Boards appointed by me under Clause (4)(i) of the said order :

1. The Chairman of a Development Board shall have the status of a Cabinet Minister of the Government of Maharashtra and he shall be entitled to have the facilities as specified in Part-A of the annexure to this Order.

2. The members of a Development Board other than the members appointed under sub-clause (d) & (e) shall be entitled to have the facilities as specified in Part-B of the annexure to this order.

Raj Bhavan,
Malabar Hill,
Bombay-400 035.

P.C.Alexander
Governor of Maharashtra

Dated the 4th July 1994.

वैधानिक विकास मंडळाच्या कामकाजासंबंधात आवश्यक कर्मचारी वृंदाची पदनिर्मिती करणेबाबत

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- वैविमं-१०९४/प्र. ३९/का. १४५२.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ७ जुलै १९९४.

वाचा:- [१] राज्यपालांचे सचिव यांचे अर्धशासकीय पत्र क्र. जीएसए-२४/४७२, दि. ६ मे १९९४.

[२] शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक- वैविमं-१०९४/प्र. ६३/का. १४५२, दिनांक- ६ जुलै १९९४.

शासन निर्णय

संविधानाच्या अनुच्छेद-३७१[२] मधील शक्तींचा वापर करून राष्ट्रपतींनी दि. ९ मार्च १९९४ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये महाराष्ट्राचे राज्यपालांना विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्यास प्राधिकृत केले आहे. त्यानुसार राज्यात वरीलप्रमाणे ३ मंडळे स्थापन करण्याबाबत आदेश राज्यपालांनी दि. १ मे १९९४ रोजी पारित केले आहेत. उपरोक्त मंडळांसाठी अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या नियुक्तीचे आदेश देखील राज्यपालांनी दि: २५ जून १९९४ रोजी पारित केले आहेत.

२. उपरोक्त ३ मंडळांच्या कार्यालयातील कामकाजासाठी खालील प्रमाणे तात्पुरती पदे याद्वारे निर्माण करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. पदाचे नांव | वेतन श्रेणी | तीन मंडळांसाठी एकूण पदांची संख्या |
|---|---|---|
| [अ] मंडळांच्या अध्यक्षांकरिता | | |
| १] लघुलेखक [उच्च श्रेणी] [इंग्रजी व मराठी दोन्हीचे ज्ञान असलेला] | २०००-६०-२३००-द. रो. -७५-३२०० | ३ |
| २] शिपाई | ७५०-१२-८७०-द. रो. -१४-९४० | ३ |
| ३] वाहन चालक | ९५०-२०-११५०-द. रो. -२५-१५०० | ३ |

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतन श्रेणी | तीन मंडळांसाठी एकूण पदांची संख्या |
| --- | --- | --- | --- |
| **[ब] सदस्य सचिवांकरिता:-** | | | |
| १] | सह संचालक [अर्थ व सांख्यिकी संचालनालय] | ३२००-१००-३५००-१२५-४६२५ | ३ |
| २] | लघुलेखक [उच्च श्रेणी] | २०००-६०-२३००-द. रो.-७५-३२०० | ३ |
| ३] | संशोधन सहाय्यक | १६४०-६०-२६००-द. रो.-७५-२९०० | ३ |
| ४] | वरिष्ठ लिपिक | १२००-३०-१५६०-द. रो.-४०-२०४० | ३ |
| ५] | लिपीक टंकलेखक | ९५०-२०-११५०-द. रो.-२५-१५०० | ३ |
| ६] | शिपाई | ७५०-१२-८७०-द. रो.-१४-९४० | ६ |
| ७] | वाहन चालक | ९५०-२०-११५०-द. रो.-२५-१५०० | ३ |
| | | एकूण पदे - | २३ |

३. उपरोक्त पदांचा संबंधितांनी कार्यभार स्वीकारल्यापासून ही पदे अस्तित्वात येतील व प्रथमतः [illegible] दि. २८ फेब्रुवारी १९९५ पर्यंत अस्तित्वात राहतील. ही पदे पुढे चालू ठेवण्याचा प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह जानेवारी १९९५ च्या अखेरपर्यंत शासनास सादर करण्यात यावा.

४. उपरोक्त पदांपैकी सह संचालक व संशोधन सहाय्यक ही पदे अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील योग्य अशा व्यक्तींच्या [अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या] प्रतिनियुक्तीने भरण्यात यावीत. शिपाई या पदासाठी विहीत पध्दतीचा वापर करून सेवायोजन कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या योग्य उमेदवारांची निवड करावी. अन्य पदांवर योग्य अशा कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने निवड करण्याची कार्यवाही करावी.

५. उपरोक्त पदांपैकी सह संचालक व संशोधन सहाय्यक ही पदे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संबंधित संवर्गातील असतील आणि उर्वरित पदे ही महसूल विभागाच्या संबंधित संवर्गातील असतील. वरील सर्व पदे

६. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी टेबल-खुर्च्या, टंकलेखन यंत्रे व इतर सामग्री, तसेच उपरोक्त पदावरील जुलै १९९४ ते डिसेंबर १९९४ अखेरपर्यंतचा वेतन व भत्त्यांवरील होणारा अनावर्ती/आवर्ती खर्च शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक- वैविमं-१०९४/प्र.६३/का.१४५२, दि. ६ जुलै १९९४ अन्वये राज्यपालांचे सचिव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमातून भागविण्यात यावा. हा खर्च शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र.आकनि-११९४/०३६/अर्थसंकल्प-१५, दि.६ जुलै १९९४ [सांकेतिक क्र.८०००-०३६-४] अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या रु. ४०,६२,०००/- [रुपये चाळीस लक्ष बासष्ट हजार फक्त] अग्रिमातून प्रथम भागविण्यात यावा व मुख्य लेखाशीर्ष मागणी क्रमांक-"ओ-६-३४५१-सेक्रेटरीएट आर्थिक सेवा-०९०, सेक्रेटरीएट-[दोन] राज्य नियोजन यंत्रणेत वाढ करणे- वैधानिक विकास मंडळे [योजनांतर्गत][भारित]"यासमोर नोंदविण्यात यावा.

७. उपरोक्त बाबींवरील खर्चासाठी राज्यपालांचे सचिव आणि संबंधित वैधानिक विकास मंडळाचे सदस्य-सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच मंडळाचे सदस्य सचिव हे प्रतिस्वाक्षरी अधिकारी म्हणून काम पाहतील आणि, मंडळाच्या कार्यालयातील सह संचालक [अर्थ व सांख्यिकी संचालनालय] हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील.

८. आकस्मिकता निधीतून काढलेल्या सदर रकमेचा परतावा करण्यासाठी व १९९४-९५ च्या आर्थिक वर्षातील उर्वरित कालावधीसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेसाठी तसेच ही बाब विधीमंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी आवश्यक ती पूरक मागणी १९९४-९५ च्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात यावी.

९. रक्कम खर्ची टाकण्यात आल्यानंतर "आकस्मिकता निधी अग्रिम शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक- आकनि-११९४/०३६/अर्थसंकल्प-१५, दि. ६ जुलै १९९४ अन्वये मंजूर झाला आहे" असे लाल शाईने लिहावे. तसेच अग्रिमातारे घेतलेली रक्कम प्रत्यक्ष खर्ची केल्याची माहिती वित्त विभागास पाठवावी.

१०. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग [सेवा उपविभाग] यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-५३४/९४/व्यय-३, दि. २९ जून १९९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ दि. रा. जवाहिरे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

[१] राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३५.

[२] राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३५.

[३] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

[४] वित्त विभाग [व्यय-३/अर्थसंकल्प ३/अर्थसंकल्प-१५].

[५] नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई. [का. १४२४]

[६] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

[७] निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

[८] सामान्य प्रशासन विभाग [२५, १४ व १४-अ कार्यासन].

[९] अप्पर आयुक्त, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, नागपूर.

[१०] अप्पर आयुक्त, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, द्वारा:-विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

[११] अप्पर आयुक्त, उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.

[१२] संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

[१३] संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ६वा मजला, मुंबई.

[१४] विभागीय आयुक्त, नागपूर/औरंगाबाद/कोकण विभाग.

घटनेच्या अनुच्छेद-३७१[२] अन्वये स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळांना सहकार्य देऊन आवश्यक ती माहिती पुरविणे.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन परिपत्रक क्र. वैविमं-१०९४/सीआर-७७/का. १४५२.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २७ जुलै १९९४.

परिपत्रक:-

घटनेच्या अनुच्छेद-३७१[२] अन्वये भारताच्या राष्ट्रपतींनी महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवून त्याकरिता विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे स्थापण्यास प्राधिकृत केलेले आहे. त्या अनुषंगाने राज्यपालांनी त्यांचे आदेश क्रमांक-जीएसए/डीबी/९४/७७९, दिनांक- २५ जून १९९४ अन्वये विकास मंडळे पुढीलप्रमाणे स्थापित केली आहेत. [आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.]

विदर्भ विकास मंडळ

[१] प्रो. राम मेघे .. अध्यक्ष
[२] श्री. मधुकरराव किंमतकर .. सदस्य
विधान परिषद सदस्य
[३] श्री. प्रकाश पाटील .. सदस्य
अध्यक्ष, जिल्हा परिषद-चंद्रपूर
[४] श्री. एच. बी. उलेमाले .. सदस्य
[५] डॉ. एस. ए. देशपांडे .. सदस्य
[६] विभागीय आयुक्त, नागपूर विभाग .. सदस्य
[७] श्री. एस. एस. भाके .. सदस्य सचिव

......./कृ. मा. पहा/

## मराठवाडा विकास मंडळ

| | |
|---|---|
| [१] श्री. कमलकिशोर कदम | अध्यक्ष |
| [२] श्री. रायभान जाधव, विधानसभा सदस्य | सदस्य |
| [३] श्री. जीवनराव गोरे, अध्यक्ष, जिल्हा परिषद उस्मानाबाद | सदस्य |
| [४] श्री. बी. ए. कुलकर्णी | सदस्य |
| [५] श्री. गोपाळ विनायक अभंगे | सदस्य |
| [६] विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग | सदस्य |
| [७] श्री. एस. एल. कुलकर्णी | सदस्य सचिव. |

## उर्वरित महाराष्ट्रासाठी विकास मंडळ

| | |
|---|---|
| [१] श्री. राम प्रधान | अध्यक्ष |
| [२] श्री. शरद रणपिसे, विधानसभा सदस्य | सदस्य |
| [३] श्री. अनिल देशमुख, अध्यक्ष, चाळीसगाव नगरपालिका | सदस्य |
| [४] श्री. एम. डी. साठे | सदस्य |
| [५] श्री. पी. बी. पाटील | सदस्य |
| [६] विभागीय आयुक्त, कोकण विभाग | सदस्य |
| [७] श्री. पी. जी. कुर्से | सदस्य सचिव. |

या मंडळांची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहे. :-

[अ] संपूर्ण राज्यातील विकासाच्या पातळयाच्या तुलनेत योग्य निर्देशांकांच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रांची विकासाची सापेक्ष पातळी निश्चित करणे.

[ब] मंडळाच्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील विकासाचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामां

[क] वार्षिक तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकास खर्चाच्या पातळ्या सुचविणे, आणि

[ड] मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करणे व तो महाराष्ट्र राज्य विधान मंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यावर व्यवहार्य असेल तेथवर ३ महिन्यांच्या कालावधीत राज्यपालांना सादर करणे.

यासंबंधी राज्यपालांनी काढलेल्या क्रमांक- जीएस/जी/९४/डीबी/४३२, दिनांक- ३० एप्रिल १९९४ च्या आदेशाची प्रतही सोबत जोडली आहे.

२. वर नमूद केलेल्या मंडळांच्या सन्माननीय अध्यक्षांना राज्याच्या कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेला आहे. मंडळाचे अध्यक्ष किंवा सदस्य हे मंडळाच्या कामासाठी आवश्यक असलेली कामाची माहिती घेण्यासाठी दौरा करतील त्यावेळी सर्व संबंधित अधिका-यांनी त्यांना योग्य ती माहिती देणे व संपूर्ण सहकार्य करणे अपेक्षित आहे. तसेच मंडळांची कामे पार पाडण्यासाठी या विकास मंडळांना विविध भागांतील विकासाच्या पातळ्या, त्यासाठी आतापर्यंत झालेला खर्च, विकासातील असमतोल दूर करण्यासाठी आवश्यक असलेला निधी, त्यासंबंधी आवश्यक ती अनेक प्रकारची सांख्यिकी व आकडेवारी यासंबंधीची माहिती वेळोवेळी लागेल.

३. या मंडळांचे अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव यांना मंडळांची कामे पार पाडण्यास आपण सर्वतोपरी सहकार्य करावे व त्यांना आवश्यक असलेली माहिती तातडीने पुरवावी, अशी मी आपणास विनंती करतो.

....... ४..

४. याबाबत आपण आपल्या नियंत्रणाखालील अधिका-यांनाही आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ एन. रघुनाथन ]
मुख्य सचिव
महाराष्ट्र शासन.

प्रति :

[१] राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३५,
[२] मुख्यमंत्र्यांचे सचिव,
[३] सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
[४] वैधानिक विकास मंडळांचे सर्व अध्यक्ष व सदस्य [पत्राने],
[५] शासनाचे सर्व प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव / सचिव,
[६] मंत्रालयाचे सर्व विभाग,
[७] सर्व विभागीय आयुक्त,
[८] सर्व जिल्हाधिकारी,
[९] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
[१०] सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
[११] मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख,
[१२] अपर आयुक्त, विदर्भ वैधानिक विकास मंडळ द्वारा - विभागीय आयुक्त, नागपूर,
[१३] अपर आयुक्त, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ द्वारा - विभागीय आयुक्त, औरंगाबाद,
[१४] अपर आयुक्त, उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळ द्वारा - विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.

विषय:- वैधानिक विकास मंडळांच्या कामकाजा-
संबधक्त अधिका-यांची पदनिर्मिती करणे-
बाबत...

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- वैविमं-१०९४/सीआर-३८/का. १४५२.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ४ ऑगस्ट १९९४.

वाचा:- [१] राज्यपालांचे सचिव यांचे अ. शा. प. क्र. जीएसए-९४/४७१, दि. ६ मे १९९४.
[२] शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक- वैविमं-१०९४/ प्र. ६३/का. १४५२, दि. ६ जुलै १९९४.
[३] शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक- वैविमं-१०९४/ प्र. ३९/का. १४५२, दिनांक- ७ जुलै १९९४.

## शासन निर्णय

संविधानाच्या अनुच्छेद-३७१[२] मधील शक्तींचा वापर करून राष्ट्रपतींनी दिनांक- ९ मार्च १९९४ रोजी पारित केलेल्या आदेशांमुळे महाराष्ट्राचे राज्यपालांना विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्यास प्राधिकृत केले आहे. त्यानुसार राज्यात वरीलप्रमाणे तीन मंडळे स्थापन करण्याबाबतचे आदेश राज्यपालांनी दिनांक- १ मे १९९४ रोजी पारित केले आहेत. उपरोक्त मंडळांसाठी अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या नियुक्तीचे आदेश देखील राज्यपालांनी दिनांक- २५ जून १९९४ रोजी पारित केले आहेत.

२. प्रत्येक वैधानिक विकास मंडळाची कार्ये सर्वसाधारणपणे खालील-प्रमाणे असतील:-

[१] संपूर्ण राज्यातील विकासाच्या पातळयांच्या तुलनेत योग्य निर्देशांकाच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रांची विकासाची पातळी निश्चित करणे,

[२] मंडळाच्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील विकासाचा असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामांचे मूल्यमापन करणे

[३] वार्षिक योजना व पंचवार्षिक योजनेच्या कालात [illegible] विकास मंडळाच्या क्षेत्रात विकासासाठीच्या खर्चाच्या पातळ्या सुचविणे,

[४] महाराष्ट्र राज्य विधान मंडळापुढे [illegible] करण्यासाठी मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यावर शक्यतोवर तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यपालांना सादर करणे,

[५] राष्ट्रीय योजनेमध्ये मान्य केलेली उद्दिष्टे व लक्ष्ये विचारात घेऊन मंडळाच्या कार्यक्षेत्राचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी प्रयत्न करणे,

[६] राज्याची एकूण गरज विचारात घेऊन विकास मंडळाच्या क्षेत्रासाठी समन्यायाने निधीचे वाटप होण्यासाठी राज्यपालांना सल्ला देणे,

[७] विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विकासाचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने प्राथम्ये व उपाययोजनांबाबत राज्यपालांना सल्ला देणे,

[८] विकास मंडळाच्या क्षेत्रातील विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे व मूल्यमापन करणे,

[९] विकास मंडळाच्या क्षेत्राशी संबंधित विकासाच्या दृष्टिकोनातून राज्यपालांनी वेळोवेळी नेमून दिलेल्या विषयांबाबत राज्यपालांना सल्ला देणे.

३. उपरोक्त तीन मंडळांच्या कार्यालयात मंडळाचे सदस्य सचिव म्हणून काम पाहाण्यासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे खालील तात्पुरती पदे याद्वारे निर्माण करण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतन श्रेणी | प्रत्येकी एक याप्रमाणे तीन मंडळांसाठी एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | अपर आयुक्त | ३९५०-१२५-४८००-[illegible] किंवा ४८००-१५०-५१००[भा.प्र.से.] | ३ |

४. उपरोक्त पदांचा संबंधितांनी कार्यभार स्वीकारल्यापासून ही पदे अस्तित्वात [illegible] व प्रथमत: ती दि. २८ फेब्रुवारी १९९५ पर्यंत अस्तित्वात राहतील.

ही पदे पुढे चालू ठेवण्याचा प्रस्ताव त्याच्या समर्थनासह जानेवारी १९९५ च्या अखेरपर्यंत शासनात सादर करण्यात यावा.

५. वरील सर्व पद ही नियोजन विभागाच्या नियंत्रणाखाली आणि संबंधित विभागीय आयुक्तांच्या आस्थापनेवर तात्पुरती जादा पदे असतील.

६. उपरोक्त पदांवरील जून १९९४ ते डिसेंबर १९९४ अखेरपर्यंतचा वेतन व भत्त्यांवरील होणारा खर्च शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक- वैविमं -१०९४/प्र. ६३/का. १४५२, दिनांक- ६ जुलै १९९४ अन्वये राज्यपालांचे सचिव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमातून भागविण्यात यावा. हा खर्च शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक- आकनि-११९४/०३६/अर्थसंकल्प-१५, दिनांक- ६ जुलै १९९४ [संगणक संकेतांक क्र. ७०००-०३६-४] अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या रु. ४०,६२,००० [रुपये चाळीस लाख बासष्ट हजार फक्त] अग्रिमातून प्रथम भागविण्यात यावा व मुख्य लेखाशीर्ष मागणी क्र. "ओ-६-३४५१-सेक्रेटरिएट आर्थिक सेवा-०९०, सेक्रेटरीएट- [दोन] राज्य नियोजन यंत्रणेत वाढ करणे- वैधानिक विकास मंडळे [योजनांतर्गत][भारित]" [संगणक संकेतांक क्र. ३४५१-०४४-९] याखालीर नोंदविण्यात यावा.

७. उपरोक्त बाबीवरील खर्चासाठी राज्यपालांचे सचिव आणि संबंधित वैधानिक विकास मंडळांचे सदस्य-सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच मंडळाचे सदस्य सचिव हे प्रतिस्वाक्षरी अधिकारी म्हणून काम पाहतील आणि मंडळाच्या कार्यालयातील सह संचालक [अर्थ व सांख्यिकी संचालनालय] हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील.

८. आकस्मिकता निधीतून काढलेल्या सदर रकमेचा परतावा करण्यासाठी व १९९४-९५ च्या आर्थिक वर्षातील उर्वरित कालावधीसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेसाठी, तसेच ही बाब विधी मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी आवश्यक ती पूरक मागणी १९९४-९५ च्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात यावी.

९. रक्कम तथा ताळण्यात आल्यानंतर "आकस्मिकता निधी

अग्रीम शासन आपन वित्त विभाग क्रमांक:- आकनि-११९९/०३६/अर्थसंकल्प-१५,
दिनांक- ६ जुलै १९९४ अन्वये मंजूर झाला आहे." असे लाल शाईने लिहावे.
तसेच अग्रीमाधारे घेतलेली रक्कम प्रत्यक्ष जमा केल्याची माहिती वित्त
विभागास पाठवावी.

१०. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग [सेवा उपविभाग] यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक- सीआर-५८२/९४/व्यय-३, दिनांक- २५ जुलै १९९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ दि. रा. जवाहिरे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

[१] राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३५.
[२] राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३
[३] महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
[४] महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर.
[५] वित्त विभाग [व्यय-३/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१५].
[६] विधिमंडळ विभाग, मंत्रालय, मुंबई [का. १४२४].
[७] अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
[८] निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
[९] सामान्य प्रशासन विभाग [२५, १० व २०-अ कार्यासन].
[१०] अपर आयुक्त, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, नागपूर.
[११] अपर आयुक्त, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
[१२] अपर आयुक्त, उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.
[१३] संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
[१४] संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मुंबई.
[१५] विभागीय आयुक्त, नागपूर/औरंगाबाद/ कोकण विभाग.

घटनेच्या अनुच्छेद-३७१[२] अन्वये स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळांच्या कामकाजासंबंधात तयार करण्यात आलेले नियम.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन परिपत्रक क्र. वैविमं-१०९४/सीआर-८९/का. १४५२.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १९ ऑगस्ट १९९४.

संदर्भ:- शा. प. नि. वि. क्र. वैविमं-१०९४/सीआर-७७/का. १४५२, दि. २७ जुलै १९९४.

प रि प त्र क

घटनेच्या अनुच्छेद-३७१[२] अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे स्थापन करण्यात आली असून या मंडळांच्या कामकाजासंबंधीचे नियम दि. ५ ऑगस्ट १९९४ च्या असाधारण राजपत्रात [भाग-४] प्रसिध्द करण्यात आले आहेत. या नियमांची एक प्रत या परिपत्रकासोबत आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ शा. गो. प्रभुदेसाई ]
उप सचिव.

प्रति
[१] राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३५.
[२] मुख्यमंत्र्यांचे सचिव,
[३] सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
[४] वैधानिक विकास मंडळांचे सर्व अध्यक्ष व सदस्य [पत्राने],
[५] शासनाचे सर्व प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव/सचिव,
[६] मंत्रालयाचे सर्व विभाग,
[७] सर्व विभागीय आयुक्त,
[८] अपर आयुक्त व सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, नागपूर,
[९] अपर आयुक्त, व सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, औरंगाबाद,
[१०] अपर आयुक्त व सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई,
[११] संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे [पूर्व], मुंबई-४०० ०५१,
[१२] सर्व जिल्हाधिकारी,
[१३] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

53

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२

असा. क्र. ५१

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

शुक्रवार, ऑगस्ट ५, १९९४/श्रावण १४, शके १९१६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

---

### OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA

Raj Bhavan, Bombay 400 035, dated the 5th August 1994

No GSA/DB/94/990.—In exercise of the powers conferred by clause 11 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Order, 1994, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules namely :—

1. *Short title*.—These rules may be called the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Rules, 1994.

2. *Definition*.—In these rules, under the context otherwise requires,—

(1) " Area " means the area of the respective Development Boards as specified in clause 3 of the Order;

(2) " Board " means the Boards constituted by the Governor under clause 2 of the Order;

(3) " Chairman " means Chairman appointed by the Governor on the respective Board;

(4) " Governor " means the Governor of Maharashtra State;

(5) " Member " means members appointed by the Governor on the Boards;

(6) " Order " means the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Order, 1994.

3. *Headquarters of the Board.*—The Headquarters of each Board shall be as follows :—

| Board | Headquarter |
|---|---|
| (a) The Vidarbha Development Board. | Nagpur. |
| (b) The Marathwada Development Board | Aurangabad. |
| (c) The Development Board for rest of Maharashtra | Bombay. |

4. *Functions of a Board, Chairman and Member-Secretary.*—(1) The Chairman shall convene, approve the agenda for, preside over and authenticate the proceedings of all meetings of a Board.

(2) The Chairman of a Board may invite any officer (not below the rank of a District Level Officer) of the State Government or Local Authority if deemed necessary, for any of the meetings of the Board or the Committees of the Board.

(3) A Board may appoint a Special Subject Committee consisting of any one or more Members to consider and deliberate on any special sector of economic development and such a Committee may include subject matter Specialists or Experts in the subject on which the Committee is appointed. The total Membership of any such Special Committee shall not exceed Five. The Chairman of the Board shall be the Chairman of all such Special Committees.

(4) Tours and travels by the Members of the Board or any Officer of the Board for the purposes of the Board shall be undertaken only with the prior permission of the Chairman of the Board.

(5) All deliberations, orders, resolutions, recommendations and letters shall be issued under the seal and signature of the Member-Secretary on behalf of the Board.

(6) The Member-Secretary shall prepare the agenda for the meetings of the Board and will place it before the Board in their meetings with the prior approval of the Chairman.

(7) The Member-Secretary shall write the minutes of the Board and record the recommendations made and decisions taken by the Board. These records shall be authenticated by the Chairman of a Board in a subsequent meeting.

(8) The Member-Secretary of the Board shall be responsible for the conduct and maintenance of all correspondence of a Board.

(9) All Officers and staff of a Board shall work under the control, supervision and guidance of the Member-Secretary.

(10) The Member-Secretary shall prepare periodical reports including the annual report and annual accounts on the working of the Board and Submit the same to the Governor. Such reports may include the items of work that the Board has accomplished, the recommendations made and also the issues included on agenda which were not considered or decisions regarding which were not taken.

(11) TheMember-Secretary of a Board may call for the required information from any Department of the State Government or any officer working under any Department or any Local Authority for the purpose and the use of the Board.

5. *Meetings of a Board.*—(1) There shall be an Agenda for each meeting of a Board as approved by the Chairman of the Board.

(2) The meetings of a Board shall, as far as possible be held at the Head Quarter of the Board and the period of not more than 60 days shall lapse between the two consecutive meetings of the Board. Notice of the meeting of a Board shall be given by the Member-Secretary to the member not less than 10 days in advance.

(3) Presence of quorum not less than three members, excluding the Chairman, shall constitute Quorum for each meeting of the Board. For want of Quorum the meeting shall be adjourned and held again without requiring Quorum after an interval of 10 minutes.

(4) Every meeting of a Board shall be presided over by the Chairman of the Board. In the absence of the Chairman, a Member to be elected by the Members present by consensus shall act as the Chairman in such a meeting.

(5) Proceedings of the meetings of a Board shall be duly recorded in the permanent register to be maintained by the Member-Secretary.

6. *Decisions in the meeting.*—(1) Decisions in the meeting shall be taken by the consensus of the members present and not by taking a vote. In case of any dispute about the consensus decision, the Chairman's decision shall be final.

(2) The decisions of the Board shall be registered in the form of recommendations and submitted by the Member-Secretary to the Governor with a forwarding letter.

(3) The Member-Secretary of the Board shall maintain a permanent register of recommendations adopted and submitted to the Governor in chronogical order giving serial number to each of the recommendations.

7. *Issue of directives and allocation of funds by the Governor.*—(1) In furtherance of and to comply with the functions assigned to a Board in the Order, the Governor may issue directives from time to time. Any such directive issued by the Governor shall be complied with by a Board.

(2) The State Government shall submit to the Governor the schedule of preparation of Plans and Budget in advance for his information.

(3) The Governor shall allocate funds amongst the Boards, after taking into consideration the requirement of the State as a whole and the recommendations of the Board.

(4) The Planning Department shall indicate to the Governor the approximate amount of total resources likely to be available to the State Government within a month after the end of the Budget Session of the Legislature for the development expenditure during the subsequent year.

(5) While working out the likely amount for development expenditure for the subsequent year, due consideration shall be given to the amounts required by the State Government for the following items of expenditure which shall be set aside—

(*i*) Charged expenditure,

(*ii*) Non-Plan expenditure,

(*iii*) Outlay on Externally Aided Programmes,

(*iv*) Outlay on Centrally Assisted Programmes,

(*v*) Programmes and Projects which benefit the areas extending beyond one Board or the entire State and wherein the investment is indivisable,

(*vi*) Expenditure related to programmes and projects related to investments by either domestic or international private sectors,

(*vii*) Expenditure related to implementation of Inter-State Agreements or Inter-State Awards and Court Decisions,

(*viii*) The funds to be allocated to local bodies in pursuance of Government decisions on the recommendations of the State Finance Commission constituted by the Governor in pursuant to clause (1) of Article 243-I of the Constitution.

(*ix*) Any other item of expenditure which may be deemed fit as requirement of the State as a whole by the Governor.

(6) If and when there is an occasion to revise the amount of development expenditure as communicated to the Governor, such change shall be intimated to the Governor immediately after the State Government decides on such a revision.

(7) The Governor may issue directives to the State Government allocating funds to various areas under the different Boards and, further, such directives of the Governor may indicate allocations to each sector or sub-sector as deemed fit by the Governor.

8. *Equitable arrangement for Education, Training and Employment.*—(1) The Technical Education Department shall conduct a bench mark survey and prepare the statistical information on available opportunities in Technical Education and Vocational Training in the areas under each Board. The Governor may then take a view on the levels of development in this sector and also determine the backlog if any with reference to average indicators of such opportunities in the State as a whole.

(2) While considering these opportunities of Technical Education, all the Government Institutions and Government Aided Institutions in the areas shall be taken into consideration.

(3) The General Administration Department shall prepare the statistical information on opportunities available in employment in service under the control of State Government in the areas under the respective Board. Such information, once prepared on the basis of a predetermined date, shall be revised annually. The information would include posts available for recruitment on account of new posts created or the posts falling vacant due to retirement etc. in that year.

(4) The Governor may issue directives regarding procedure to be followed and percentage of vacancies to be earmarked for suitable persons from the respective areas against these vacancies.

(5) While recruiting the candidates as per directives of the Governor the prescribed normal procedure shall be followed by the appointing authorities. Any post available for recruitment thereafter, will be filled in by following the normal procedure applicable to such posts under the State Government.

Raj Bhavan, Malabar Hill,
Bombay 400 035.
Dated the 5th August 1994.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TRIPATHI,
Secretary to Governor.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

(57)

असा. क्र. ५१अ

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

शुक्रवार, ऑगस्ट ५, १९९४/श्रावण १४, शके १९१६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

---

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या सचिवांचे कार्यालय

राजभवन, मुंबई ४०० ०३५, दिनांक ५ ऑगस्ट १९९४

क्रमांक जीएसए/डीबी/९४/९९०.—विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेश, १९९४ याच्या खंड ११ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील नियम करीत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांस विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे नियम, १९९४ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(१) "क्षेत्र" म्हणजे, आदेशाच्या खंड ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे, संबंधित विकास मंडळाचे क्षेत्र,

(२) "मंडळ" म्हणजे, आदेशाच्या खंड २ अन्वये राज्यपालांनी रचना केलेले मंडळ,

(३) "अध्यक्ष" म्हणजे, राज्यपालांनी संबंधित मंडळावर नियुक्त केलेला अध्यक्ष,

(४) "राज्यपाल" म्हणजे, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल,

(५) "सदस्य" म्हणजे, राज्यपालांनी मंडळांवर नियुक्त केलेले सदस्य,

(६) "आदेश" म्हणजे, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश १९९४.

३. मंडळाची मुख्यालये.—प्रत्येक मंडळाची मुख्यालये पुढीलप्रमाणे असतील :—

| मंडळ | मुख्यालय |
|---|---|
| (अ) विदर्भ विकास मंडळ .. .. | नागपूर |
| (ब) मराठवाडा विकास मंडळ .. .. | औरंगाबाद |
| (क) उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ .. .. | मुंबई |

४. मंडळ अध्यक्ष व सदस्य-सचिव यांची कामे.—(१) अध्यक्ष, मंडळाच्या सर्व बैठकी बोलावील, त्या बैठकींच्या कार्यसूचीस मान्यता देईल, त्या बैठकींचे अध्यक्षपद भूषविल.

(२) मंडळाचा अध्यक्ष, आवश्यक वाटल्यास, मंडळाच्या किंवा मंडळाच्या समित्यांच्या कोणत्याही बैठकींना राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या (जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या) कोणत्याही अधिकाऱ्याला आमंत्रित करु शकेल.

(३) आर्थिक विकासाच्या कोणत्याही विशेष खंडाचा विचार करण्यासाठी किंवा त्यावर चर्चा करण्यासाठी कोणत्याही एका किंवा त्याहून अधिक सदस्यांचा समावेश असलेल्या विशेष विषय समितीची मंडळास नियुक्ती करता येईल आणि अशा समितीमध्ये ज्या विषयाच्या संबंधात समितीची नियुक्ती करण्यात आली असेल त्या विषयातील विशेषज्ञ किंवा तज्ञ व्यक्तींचा समावेश असू शकेल अशा कोणत्याही विशेष समितीची एकूण सदस्य संख्या पाचहून अधिक असणार नाही. मंडळाचा अध्यक्ष हा अशा सर्व विशेष समित्यांचा अध्यक्ष असेल.

(४) मंडळाच्या प्रयोजनांकरिता मंडळाच्या सदस्यांनी किंवा मंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने करावयाचे दौरे व प्रवास हे मंडळाच्या अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीनेच केवळ करण्यात येतील.

(५) सर्व चर्चा, आदेश, निर्णय, शिफारशी व पत्रे ही, मंडळाच्या वतीने सदस्य-सचिवाच्या सही शिक्क्यानिशी पाठवण्यात येतील.

(६) सदस्य-सचिव मंडळाच्या बैठकींची कार्यसूची तयार करील आणि अध्यक्षाच्या पूर्व मान्यतेने ती मंडळाच्या बैठकींच्या वेळी मंडळापुढे ठेवील.

(७) सदस्य-सचिव मंडळाची कार्यवृत्ते लिहिल आणि मंडळाने केलेल्या शिफारशी व घेतलेले निर्णय नोंदवून ठेवील. हे अभिलेख नंतरच्या बैठकीमध्ये अध्यक्षाकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

(८) मंडळाचा सदस्य-सचिव हा मंडळाचा सर्व पत्रव्यवहार करण्यास व तो सांभाळण्यास जबाबदार असेल.

(९) मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सदस्य-सचिवांच्या नियंत्रणाखाली, पर्यवेक्षणाखाली व मार्गदर्शनाखाली काम करतील.

(१०) सदस्य-सचिव मंडळाच्या कामकाजाबाबत नियतकालिक तसेच वार्षिक अहवाल आणि वार्षिक लेखे तयार करील आणि ते राज्यपालांकडे सादर करील. अशा अहवालांमध्ये मंडळाने केलेली कामे, केलेल्या शिफारशी तसेच कार्यसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या परंतु ज्यांवर विचार झाला नाही किंवा ज्यांच्या बाबतीत निर्णय घेण्यात आला नाही अशा बाबींचा समावेश असेल.

(११) सदस्य-सचिव, मंडळाच्या प्रयोजनाकरिता आणि वापराकरिता आवश्यक ती माहिती राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाकडून किंवा कोणत्याही विभागात किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणामध्ये काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून मागवू शकेल.

५. मंडळाच्या बैठकी.—(१) मंडळाच्या प्रत्येक बैठकीसाठी मंडळाच्या अध्यक्षाकडून मान्य करण्यात येईल अशी कार्यसूची असेल.

(२) मंडळाच्या बैठकी शक्यतोवर मंडळाच्या मुख्यालयात घेण्यात येतील आणि मंडळाच्या लागोपाठच्या दोन बैठकींमध्ये ६० दिवसांपेक्षा अधिक कालावधी असणार नाही. सदस्य-सचिव, मंडळाच्या बैठकीची सूचना किमान १० दिवस आधी सदस्यांना देईल.

(३) मंडळाच्या प्रत्येक बैठकीची गणपूर्ती होण्यास अध्यक्ष वगळता किमान तीन सदस्यांची आवश्यकता असेल. गणपूर्तीअभावी बैठक तहकूब करण्यात येईल व १० मिनिटांच्या मध्यंतरानंतर ती पुन्हा घेण्यात येईल. त्यावेळी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

(४) मंडळाचा अध्यक्ष हा मंडळाच्या प्रत्येक बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल. अध्यक्षाच्या अनुपस्थितीत, उपस्थित सदस्यांनी सर्वानुमते निवडून दिलेला सदस्य, अशा बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(५) मंडळाच्या बैठकीचे कामकाज कायम नोंदवहीत यथोचित रीत्या अभिलिखित करण्यात येईल व ती नोंदवही सदस्य-सचिव ठेवील

६. **बैठकींमध्ये घेण्यात आलेले निर्णय.**—(१) बैठकींमधील निर्णय हे मतदानाद्वारे नव्हे तर, उपस्थित सदस्यांच्या सर्वानुमतीने घेण्यात येतील. सर्वानुमतीने घेण्यात आलेल्या निर्णयाच्या संबंधात कोणताही वाद उद्‌भवल्यास, अध्यक्षाचा त्याबाबतीतील निर्णय हा अंतिम असेल.

(२) मंडळाचे निर्णय शिफारशींच्या स्वरूपात नोंदवून ठेवण्यात येतील आणि सदस्य-सचिव ते निर्णय अग्रेषणपत्रासह राज्यपालांकडे सादर करील.

(३) मंडळाचा सदस्य-सचिव, राज्यपालांनी स्वीकृत केलेल्या व त्यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या शिफारशींची वर्णानुक्रमे असलेली व प्रत्येक शिफारशीला अनुक्रमांक देण्यात आलेली कायम स्वरूपातील नोंदवही ठेवील.

७. **राज्यपालांनी निदेश देणे व निधीचे वाटप करणे.**—(१) आदेशामध्ये मंडळाला नेमून देण्यात आलेल्या कामाच्या पुरःस्मरणार्थ आणि त्यांचे अनुपालन करण्याकरिता, राज्यपालांना वेळोवेळी निदेश देता येतील. राज्यपालांनी दिलेल्या अशा कोणत्याही निदेशाचे मंडळ अनुपालन करील.

(२) राज्य शासन, राज्यपालांच्या माहितीकरिता, योजना व अर्थसंकल्प तयार करण्यासंबंधीचे वेळापत्रक राज्यपालांकडे आधीच सादर करील.

(३) एकंदर राज्याची गरज आणि मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन राज्यपाल मंडळामध्ये, निधीचे वाटप करतील

(४) विधानमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर एका महिन्यात नंतरच्या वर्षातील विकासविषयक खर्चाकरिता राज्य शासनाला, उत्पन्नाच्या एकूण मार्गाद्वारे उपलब्ध होऊ शकणाऱ्या रकमेचा अंदाज नियोजन विभाग राज्यपालांना देईल.

(५) नंतरच्या वर्षातील विकासविषयक खर्चाची अंदाजे रक्कम ठरवताना, राज्य शासनाला खर्चाच्या पुढील बाबींसाठी आवश्यक असणाऱ्या रकमेचाही योग्य तो विचार करण्यात येईल व ती बाजूला काढून टाकण्यात येईल:—

(एक) भारित खर्च,

(दोन) योजनेतर खर्च,

(तीन) बाहेरून मदत मिळणाऱ्या कार्यक्रमांवरील खर्च,

(चार) केंद्राकडून सहाय्य मिळणाऱ्या कार्यक्रमांवरील खर्च,

(पाच) एका मंडळाच्या किंवा संपूर्ण राज्याच्या कक्षेबाहेरील क्षेत्राला ज्यापासून लाभ मिळतो आणि ज्यामधील गुंतवणूक अविभाज्य आहे असे कार्यक्रम व प्रकल्प,

(सहा) देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय खाजगी क्षेत्रांनी केलेल्या गुंतवणुकीशी संबंधित असलेले कार्यक्रम व प्रकल्प यांच्याशी संबंधित खर्च,

(सात) आंतरराज्यीय करार किंवा आंतरराज्यीय निवाडे व न्यायालयाचे निर्णय यांच्या अंमलबजावणीशी संबंधित असणारा खर्च,

(आठ) संविधानाच्या अनुच्छेद २४३-झ च्या खंड (१) अनुसार राज्यपालांनी रचना केलेल्या राज्य वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींवरील शासनाच्या निर्णयानुसार स्थानिक संस्थांना वाटून द्यावयाचा निधी,

(नऊ) एकंदर राज्याची गरज म्हणून राज्यपालांस योग्य वाटेल अशी खर्चाची अन्य कोणतीही बाब.

(६) राज्यपालांना कळविण्यात आलेल्या विकासविषयक खर्चाच्या रकमेमध्ये सुधारणा करण्याचा प्रसंग उद्भवल्यास व तसा प्रसंग उद्भवेल तेव्हा राज्य शासनाने अशी सुधारणा करण्याचे ठरविल्यानंतर ताबडतोब अशी सुधारणा राज्यपालांना कळविण्यात येईल.

(७) राज्यपालांना, निरनिराळ्या मंडळाखाली येणाऱ्या निरनिराळ्या क्षेत्रांना निधीचे वाटप करण्यासंबंधीचे निदेश राज्य शासनाला देता येतील आणि तसेच, राज्यपालांच्या अशा निदेशांमध्ये, त्यांना (राज्यपालांना), अशा प्रत्येक क्षेत्राला किंवा दुय्यम क्षेत्राला देणे योग्य वाटेल अशा वाटप रकमेचा निर्देश करता येईल.

८. **शिक्षण, प्रशिक्षण व सेवायोजन यांसाठी समन्यायी व्यवस्था.**—(१) तंत्रशिक्षण विभाग एक स्थिरचिन्ह सर्वेक्षण करील आणि प्रत्येक मंडळाखाली येणाऱ्या क्षेत्रांमधील तंत्रशिक्षणाच्या व व्यावसायिक प्रशिक्षणाच्या उपलब्ध संधींच्या संबंधात एक आकडेवारीविषयक माहिती तयार करील. त्यानंतर राज्यपाल या क्षेत्रातील विकासाच्या टप्प्यांचे अवलोकन करतील आणि एकंदर राज्यातील अशा संधींच्या सरासरी दर्शकांच्या संदर्भात कोणताही अनुशेष असल्यास तो निर्धारीत करतील.

(२) तंत्र शिक्षणाच्या या संधींचा विचार करताना त्या क्षेत्रातील सर्व शासकीय परिसंस्था व शासकीय अनुदानप्राप्त परिसंस्था विचारात घेण्यात येतील.

(३) संबंधित मंडळाखालील येणाऱ्या क्षेत्रांमधील राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये असलेल्या, नोकरीच्या उपलब्ध संधींच्या संबंधात सामान्य प्रशासन विभाग एक आकडेवारीविषयक माहिती तयार करील. पूर्वनिर्धारित दिनांकाच्या आधारे एकदा तयार केलेल्या अशा माहितीमध्ये दरवर्षी सुधारणा करण्यात येईल. त्या वर्षात निर्माण करण्यात आलेल्या नवीन पदांमुळे सेवा-प्रवेशाकरिता उपलब्ध असणारी पदे किंवा निवृत्ती इत्यादींमुळे त्या वर्षात रिकामी होणारी पदे यांचा या माहितीमध्ये समावेश असेल.

(४) ही रिक्त पदे भरण्यासाठी संबंधित क्षेत्रांमधून योग्य व्यक्ती निवडण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती व त्या व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या पदांची टक्केवारी यासंबंधात राज्यपाल निदेश देऊ शकतील.

(५) राज्यपालांच्या निदेशांनुसार उमेदवारांची भरती करताना, नियुक्ती प्राधिकारी विहित सर्वसामान्य कार्यपद्धती अनुसरतील. त्यानंतर भरतीसाठी उपलब्ध होणारे कोणतेही पद, राज्य शासनाखालील अशी पदे भरताना लागू करण्यात येणारी सर्वसामान्य कार्यपद्धती अनुसरून भरण्यात येईल.

राजभवन, मलबार हिल
मुंबई ४०० ०३५, दिनांक ५ ऑगस्ट १९९४.

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश त्रिपाठी,**
राज्यपालांचे सचिव.

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**

वैधानिक विकास मंडळांच्या कामकाजासंबंधात आवश्यक कर्मचारीवृंदाची पदनिर्मिती करण्याबाबत व आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- वैविमं-१०९४/प्र.८४/का.१४५२.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३ ऑक्टोबर १९९४

वाचा:- [१] शासन निर्णय क्रमांक:- वैविमं-१०९४/प्र.३९/का.१४५२,
दिनांक- ७ जुलै १९९४.
[२] शासन निर्णय क्रमांक:- वैविमं-१०९४/प्र.३८/का.१४५२,
दिनांक:- ४ ऑगस्ट १९९४.

शासन निर्णय:-

संविधानाच्या अनुच्छेद-३७१[२] मधील शक्तींचा वापर करून राष्ट्रपतींनी दिनांक- ९ मार्च १९९४ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये महाराष्ट्राचे राज्यपालांना विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्यास प्राधिकृत केले आहे. त्यानुसार राज्यात वरीलप्रमाणे तीन मंडळे स्थापन करण्याबाबतचे आदेश राज्यपालांनी दिनांक- १ मे १९९४ रोजी पारित केले आहेत. उपरोक्त मंडळांसाठी अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या नियुक्तीचे आदेश देखील राज्यपालांनी दिनांक- २५ जून १९९४ रोजी पारित केले आहेत. या मंडळांच्या अध्यक्षांना कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा देण्यात आला असून त्यांना त्या दर्जाप्रमाणे अतिरिक्त कर्मचारीवृंद उपलब्ध करून देण्याचा तसेच विकास मंडळाच्या वाढीव कामाचे स्वरूप लक्षात घेता मंडळाच्या कार्यालयांसाठी जादा पदे निर्माण करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. उपरोक्त तीन मंडळांच्या अध्यक्षांसाठी, तसेच मंडळांच्या कार्यालयातील कामकाजासाठी पुढीलप्रमाणे तात्पुरती जादा पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे:-

...../कृ.मा.पहा/

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | तीन मंडळांसाठी एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| अ] मंडळांच्या अध्यक्षांकरिता | | | |
| १. | खाजगी सचिव | ३०००-१००-३५००-१२५-४५०० [अवर सचिव पदाची वेतनश्रेणी] | ३ |
| २. | स्वीय सहाय्यक | २०००-६०-२३००-द. रो.-७५-३२००-१००-३५०० [कक्ष अधिकारी पदाची वेतनश्रेणी] | ९ |
| ३. | लघुलेखक [उच्चश्रेणी] | २०००-६०-२३००-द. रो.-७५-३२०० | ३ |
| ४. | लिपिक टंकलेखक | ९५०-२०-११५०-द. रो.-२५-१५०० | ६ |
| ५. | चोपदार | ९५०-२०-११५०-द. रो.-२५-१४०० | ३ |
| ६. | शिपाई/संदेशवाहक | ७५०-१२-८७०-द. रो.-१४-९४० | १२ |
| | एकूण पदे | | ३६ |
| ब] मंडळांच्या कार्यालयांकरिता:- | | | |
| १. | प्रशासकीय अधिकारी [तहसिलदार दर्जाचा] | २०००-६०-२३००-द. रो.-७५-३२००-१००-३५०० | ३ |
| २. | संशोधन अधिकारी | २०००-६०-२३००-द. रो.-७५-३२००-१००-३५००. | ३ |
| ३. | लेखापाल | १६४०-६०-२६००-द. रो.-७५-२९०० | ३ |
| ४. | संशोधन सहाय्यक | १६४०-६०-२६००-द. रो.-७५-२९०० | ३ |
| ५. | लिपिक टंकलेखक | ९५०-२०-११५०-द. रो.-२५-१५०० | ३ |
| ६. | शिपाई | ७५०-१२-८७०-द. रो.-१४-९४० | ३ |
| | एकूण पदे | | १८ |

एकूण- [अ]+[ब] = ५४

३. उपरोक्त पदांचा, संबंधितांनी कार्यभार स्वीकारल्यापासून ही पदे अस्तित्वात येतील व प्रथमत: ती दि. २८ फेब्रुवारी, १९९५ पर्यन्त अस्तित्वात राहतील. ही पदे पुढे चालू ठेवण्याचा प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह जानेवारी, १९९५च्या अखेरपर्यन्त शासनास सादर करण्यात यावा.

४. मंडळांच्या अध्यक्षांकरिता निर्माण करण्यात आलेल्या पदांवर नेमणुका करताना शासन निर्णय, साप्रवि क्रमांक एमआरएन्-१०९३/प्र.७५/९३/२१, दि. १९ मार्च, १९९३ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

५. उपरोक्त पदांपैकी संशोधन अधिकारी व संशोधन सहाय्यक ही पदे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संबंधित संवर्गातील असतील. लेखापाल हे पद महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील असेल. वरील सर्व पदे ही उपरोक्त मंडळाच्या कार्यालयांच्या आस्थापनेवर तात्पुरती जादा पदे असतील.

६. उपरोक्त पदांपैकी संशोधन अधिकारी व संशोधन सहाय्यक ही पदे अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील योग्य अशा व्यक्तींच्या [अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या] बदलीने भरण्यात यावीत. शिपाई या पदासाठी बदलीने किंवा विहित पध्दतीचा वापर करुन सेवायोजन कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या योग्य उमेदवारांची निवड करावी.

७. उपरोक्त पदांवरील अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्ते यावरील खर्च व खाली नमूद केलेल्या बाबींवरील खर्चास/मान्यता देण्यात येत आहे. (यादार)

| अ.क्र. | खर्चाची बाब | आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेली एकूण रक्कम |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १] | तीन मंडळांच्या अध्यक्षांसाठीच्या वैयक्तिक कर्मचारीवृंदाचे वेतन व भत्ते [खाजगी सचिव, स्वीय सहाय्यक इत्यादी ३० पदांसाठी] | २,९४,३००.०० |
| २] | तीन मंडळांच्या कार्यालयांकरिता निर्माण करण्यात आलेली पदे. [प्रशासकीय अधिकारी, संशोधन अधिकारी, इत्यादी १८ पदांसाठी] | १,६४,२००.०० |
| | | ४,५८,५००.०० |

३] तीन मंडळांच्या कार्यालयास आवश्यक असलेल्या दूरध्वनी, टंकलेखन, फॅक्समशीन, फर्निचर इत्यादीवरील खर्च.

| | |
|---|---|
| | रु. ९०,०००.०० |
| [१] दूरध्वनी यंत्रे [प्रत्येक मंडळास दोन याप्रमाणे एकूण सहा] | रु. १,५०,०००.०० |
| [२] टंकलेखन यंत्रे [प्रत्येक मंडळासाठी एक मॅन्युअल मराठी व एक इंग्रजी इलेक्ट्रॉनिक्स टंकलेखन यंत्रे.] | रु. ३,००,०००.०० |
| [३] फॅक्स यंत्रणा [प्रत्येक मंडळास एक याप्रमाणे तीन] | रु. ३,००,०००.०० |
| [४] वैयक्तिक संगणक [प्रत्येक मंडळास एक याप्रमाणे तीन] | रु. ३,००,०००.०० |
| [५] झेरॉक्स मशीन [प्रत्येकास एक याप्रमाणे तीन] | रु. ३,००,०००.०० |
| [६] फर्निचर [तीन मंडळांच्या कार्यालयातील प्रस्तावित जादा १८ अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी] [प्रत्येक मंडळास १ लाख याप्रमाणे] | |
| | रु. १४,४०,०००.०० |
| ४] तीन मंडळांसाठी लेखन सामुग्री, छपाई, पुस्तक खरेदी, दूरध्वनी वरील खर्च, पेट्रोल व इंधन यावरील खर्च. | रु. ४,५०,०००.०० |
| ५] प्रवास भत्त्यावरील खर्च प्रत्येक मंडळासाठी रु. १ लाख प्रमाणे. | रु. ३,००,०००.०० |
| | एकूण रुपये : २६,४८,५००.०० |

८. उपरोक्त बाबींवरील ~~XXXXXX~~, नोव्हेंबर, १९९४ अखेरपर्यंतच्या वेतन व भत्त्यावरील होणारा खर्च, तसेच अनावर्ती खर्च शासन ज्ञापन, वित्त विभाग क्रमांक अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या रु. २६,४८,५००/- [रुपये सव्वीस लक्ष अठ्ठेचाळीस हजार पाचशे [८०००-०३६-४] अग्रीमातून

प्रथम भागविण्यात यावा व तो खर्च मुख्य लेखाशीर्ष मागणी क्रमांक "ओ–६– ३४५१–सेक्रेटरीएट आर्थिक सेवा–०९०, सेक्रेटरीएट [दोन] राज्य नियोजन यंत्रणेत वाढ करणे – वैधानिक विकास मंडळे [योजनांतर्गत] [आ.रत]" [३४५१–०४४–९] या तपोर अंतिमत: नोंदविण्यात यावा. आकस्मिकता निधीमधून मंजूर करण्यात आलेली रु. २६,४८,५०० ची तरतूद राज्यपालांच्या सचिवांच्या आधिनस्त ठेवण्यात येत आहे.

९. आकस्मिकता निधीतून काढलेल्या सदररकमेचा परतावा करण्यासाठी व १९९४–९५ च्या आर्थिक वर्षातील उर्वरित कालावधीसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेसाठी तसेच ही बाब विधी–मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी आवश्यक ती पूरक मागणी १९९४–९५ च्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात यावी.

१०. रक्कम खर्ची टाकताना देयकावर "आकस्मिकता निधी अग्रिम शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र. आकनि–११९४/०३६/अर्थसंकल्प–१५, दि. १.१०.१९९४ अन्वये मंजूर झाला आहे." असे लाल शाईने लिहावे, तसेच अग्रिमाव्दारे घेतलेली रक्कम प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती नियोजन व वित्त विभागास पाठवावी.

११. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्रक्र. ७५४/९४/व्यय–३, दि. ३० सप्टेंबर, १९९४, अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ दि. रा. जवाहिरे ]
अवर सचिव
महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई–४०० ०३५,
२. राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मलबार हिल, मुंबई–४०० ०३५,
३. महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
४. महालेखापाल, महाराष्ट्र [लेखा परीक्षा] मुंबई/नागपूर
५. वित्त विभाग [व्यय–३/ अर्थसंकल्प–३/अर्थसंकल्प–१५], मंत्रालय,
६. नियोजन विभाग, मंत्रालय, [का.–१४२४],
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

९. सामान्य प्रशासन विभाग [२५, व १४-अ कार्यासन ],
१०. अप्पर आयुक्त व सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ व्दारा:- विभागीय आयुक्त, नागपूर.
११. अप्पर आयुक्त व सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, व्दारा:- विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
१२. अप्पर आयुक्त व सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्रासाठीचे वैधानिक विकास मंडळ, व्दारा:- विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.
१३. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
१४. संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ६ वा मजला, मुंबई,
१५. विभागीय आयुक्त, नागपूर / औरंगाबाद/ कोकण विभाग, मुंबई
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर, औरंगाबाद,
१७. निवड नस्ती.

(67)

क्रमांक:- वैविमं-१०९४/सीआर-१४४/का. १४५२.

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १९ नोव्हेंबर १९९४.

प्रति

अपर आयुक्त व सदस्य सचिव,
मराठवाडा विकास मंडळ,
द्वारा:- विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद.

विषय:- अध्यक्षांसाठी मंजूर करण्यात आलेली पदे भरण्याबाबत...

संदर्भ :- नि. वि. शा. नि. क्र. वैविमं-१०९४/ प्र. ८४/का. १४५२, दि. ३ ऑक्टोबर १९९४.

महोदय,

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे विकास मंडळांच्या अध्यक्षांसाठी व कार्यालयांसाठी आवश्यक जादा पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. सा. प्र. वि. च्या क्रमांक- एसआयएन्-१०९३/प्र. ७५/९३/२१, दिनांक- १९ मार्च १९९३ च्या शासन निर्णयाची प्रत माहितीसाठी सोबत पाठवीत आहे.

आपला,

[ दि. रा. जवाहिरे ]
अवर सचिव.

19/11/94

मंत्री/राज्यमंत्री आस्थापनेवर पदे पुढे चालू ठेवण्याबाबत...

(69)

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-एमआयएन-१०९३/[प्र. क्र. ७५/९३]/२१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ११ मार्च, १९९३.

वाचा : १] शासन परिपत्रक सा. प्र. वि. क्र. एमआयएन-१०८६/ ५४/२१, दि. १५/३/१९८६.

शासन परिपत्रक सा. प्र. वि. क्र. एमआयएन-१०८६/५४/२१, दि. १५/३/१९८६ अन्वये शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार मंत्री/राज्यमंत्री आस्थापनेवर खाली दर्शविल्यानुसार कर्मचारी आकृतिबंध अनुज्ञेय आहे.

मंत्री कार्यालय

| अ. क्र. पदनाम | एकूण पदे |
|---|---|
| १] खाजगी सचिव | १ |
| २] स्वीय सहायक | ३ |
| ३] लघुलेखक | २ |
| ४] लिपिक-टंकलेखक | २ |
| ५] वाहनचालक | १ |
| ६] चोपदार | १ |
| ७] शिपाई-संदेशवाहक | ५ |
| एकूण | १५ |

राज्यमंत्री कार्यालय

| अ. क्र. पदनाम | एकूण पदे |
|---|---|
| १] खाजगी सचिव | १ |
| २] स्वीय सहायक | ३ |
| ३] लघुलेखक | २ |
| ४] लिपिक-टंकलेखक | १ |
| ५] वाहनचालक | १ |
| ६] चोपदार | १ |
| ७] शिपाई-संदेशवाहक | ४ |
| एकूण | १३ |

मागील मंत्री मंडळाचे स्थापनेनंतर वरील प्रमाणे सावधी पदे प्रत्येक मंत्री/राज्यमंत्री आस्थापनेसाठी शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. एमआयएन-१०९१/प्र. क्र. २३६/९१/२१, दि. २२/७/१९९१ अन्वये मंजूर करण्यात आली होती. त्याच धर्तीवर सदर सावधी पदे नवीन मंत्री मंडळातील प्रत्येकी १७ मंत्री व ९ राज्यमंत्री यांच्या कार्यालयांसाठी दि. ६/३/१९९३ [म. नं.] पासून सध्याच्या मंत्रीमंडळाच्या पदावधी पर्यन्त पुढे चालू ठेवण्यास शासन मंजुरी देत आहे.

सदर पदांवर नियुक्ती/प्रतिनियुक्तीसाठी कोणत्या संवर्गातील शासकीय/निमशासकीय/स्वायत्त संस्था महामंडळे इ. यातील अधिकारी/कर्मचारी पात्र असू शकतील याचा तपशिल परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविला आहे. बाहेरील उमेदवार नियुक्ती बाबतचा तपशिल परिशिष्ट अ-१ मध्ये दर्शविला आहे.

मंत्री/राज्यमंत्री आस्थापनेवर नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचा-यांना [वाहनचालक वगळून] त्या आस्थापनेवर असे पर्यंत त्यांचे श्रेणी वेतन व त्यावर सर्व अनुज्ञेय भत्ते [विशेष कार्यभत्ता वगळून] व खुंटीप्राप्त कर्मचा-यांना] तसेच शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. पाओवाय-१०८८/६०६५/२१ दिनांक २०/४/१९८२ अधाल खालील तरतुदीनुसार विशेष वेतन अनुज्ञेय असेल.

१. राज्य शासनाचे/स्वायत्त संस्था, महामंडळे यातील निम्न स्तरावरील पदे धारण करणारे कर्मचारी उच्च पदावर नेमण्यात आले असतील तर त्यांना त्यांच्या श्रेणी वेतना व्यतिरिक्त खालील दराने विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

| | विशेष वेतनाचा दर |
|---|---|
| अ] २२००/- पेक्षा अधिक मूळ वेतन घेणारे अधिकारी/कर्मचारी. | मूळ वेतनाच्या १२ ½% परंतु किमान रु. ३३०/- दरमहा व कमाल रु. ५००/- दरमहा. |
| ब] २२००/- रुपयांपर्यंत मूळ वेतन घेणारे अधिकारी/कर्मचारी | मूळ वेतनाच्या १५% परंतु किमान रु. १५० दरमहा. |

जे अधिकारी समतुल्य आणि/किंवा सदृश्य पदावर प्रतिनियुक्तीवर घेतले असतील त्यांचे बाबतीत त्यांच्या वेतना व्यतिरिक्त त्यांच्या मूळ वेतनाच्या ५% दराने परंतु दरमहा रु. २५०/- च्या मर्यादेपर्यन्त विशेष वेतन मंजूर करण्यात यावे. उपरोक्त क्र. [१] व [२] येथे नमूद केलेल्या दोन्ही प्रकरणी श्रेणी वेतन अधिक विहित दराने मिळणारे विशेष वेतन यांची रक्कम, अधिकारी/कर्मचा-याची ज्या पदावर नेमणूक केली असेल त्या पदाच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक होता कामा नये.

मंत्री आस्थापनेवरील सर्व वाहनचालकांना शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. पाओवाय-१०९०/[प्र. क्र. २८८/९०]/२१, दि. २२/६/१९९२ अन्वये द. म. रु. ४२५/- विशेष कार्यभत्ता देय राहील तसेच सर्व खुंटीप्राप्त कर्मचा-यांना शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. पाओवाय-१०९०/४२/७९/प्र. क्र. २६६/९०]/२१, दि. १६/११/१९९० अन्वये द. म. रु. १००/- विशेष कार्यभत्ता देय राहील.

१७ मंत्री व ९ राज्यमंत्री यांच्या कर्मचारी वृंदावरील वेतन, प्रवास खर्च व कार्यालयीन खर्च लेखाशीर्ष-२०५२-सेक्रेटरिएट सर्वसाधारण सेवा [३] मंत्र्यांचा स्वीय कर्मचारी वर्ग मागणी क्र. ए-७ याखालील खर्ची टाकण्यात यावा व तो ... मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. विद्यमान १७ मंत्री व राज्यमंत्री यांच्या वेतन, प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च लेखाशीर्ष

[...3/-]

२०१३-मंत्री परिषद आगणा क्र.५-२ या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. व सदर खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ साजार३७९/९३ व्यय-४, दि. १६ मार्च, १९९३ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] राज्यपालांचे सचिव,

२] मुख्यमंत्र्यांचे सचिव,

३] महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई,

४] महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर,

५] खाजगी सचिव, सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे कार्यालय,

६] सामान्य प्रशासन विभाग/का. क्र. १४, १९, २२, २३-अ,

७] वित्त विभाग [व्यय-४, अर्थसंकल्प-३, १३]

८] सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२

९] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१०] निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

११] सामान्य प्रशासन विभाग/२१ रोखशाखा [२० प्रती],

१२] संबंधित सहायक,

१३] निवड नस्ती.

# परिशिष्ट "अ"

मंत्री आस्थापनेवरील नियुक्ती/प्रतिनियुक्तीसाठी योग्य त्या संवर्गातील शासकीय/निमशासकीय अधिकारी/कर्मचारी पात्र असतील याचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र.

| अनुक्रमांक १. | पदनाम २. | संवर्ग ज्यातून प्रतिनियुक्ती करण्यात यावी ३. |
|---|---|---|
| १] | खाजगी सचिव | १. अवर सचिव/उप जिल्हाधिकारी किंवा समतुल्य वर्गातील शासकीय/निमशासकीय अधिकारी. |
| २] | स्वीय सहायक | १. निवडश्रेणी लघुलेखक |
| | | २. कक्ष अधिकारी अथवा समतुल्य वेतनश्रेणीतील शासकीय/निमशासकीय अधिकारी. |
| | | ३. सहायक अथवा समतुल्य वेतनश्रेणीतील शासकीय/निमशासकीय कर्मचारी. |
| | | [illegible] |
| | | ४. लघुलेखक [निवडश्रेणी] |
| | | ५. लघुलेखक [उच्चश्रेणी] |
| | | ६. लघुलेखक [निम्नश्रेणी] |
| ३] | लघुलेखक | १. लघुलेखक [निवडश्रेणी] |
| | | २. लघुलेखक [उच्चश्रेणी] |
| | | ३. लघुलेखक [निम्नश्रेणी] |
| | | ४. लघुटंकलेखक [ [illegible] |
| ४] | लिपिक-टंकलेखक | लिपिक, लिपिक-टंकलेखक, टंकलेखक |
| ५] | वाहनचालक | वाहनचालक. |
| ६] | चोपदार | चतुर्थश्रेणीतील कर्मचारी. पदोन्नतीद्वारे |
| ७] | शिपाई/संदेशवाहक | शिपाई/हमाल. |

मंत्री/राज्यमंत्री, आस्थापनेवरील अनुक्रमे ५ व ७ मधील पदांपैकी एखाद्या पदावर चतुर्थश्रेणीतील [illegible] वस्तु [illegible], [illegible], [illegible]-चालक, [illegible] इत्यादि उच्चश्रेणी-तील कर्मचारी नेमण्यात आल्यास, अशा कर्मचाऱ्याच्या [illegible] वेतनश्रेणीतील वेतन अधिक विशेष वेतन हे त्या पदाच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त होता कामा नये.

[..२/-

## परिशिष्ट अ-१ बाहेरील उमेदवार नियुक्ती कार्यपद्धती

सध्याच्या प्रचलित नियुक्ती नियम पद्धतीनुसार सर्व [illegible] याना स्वीय सहायक व शिपाई/संदेशवाहक पदापैकी प्रत्येकी [illegible] पद [illegible] बाहेरील उमेदवार म्हणून नेमण्याची मुभा आहे. मात्र स्वीय सहायक [illegible] नियुक्तीसाठी सुचविलेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता कमीत कमी एस.एस.सी. उत्तीर्ण व त्याची वयोमर्यादा २५ वर्षापेक्षा कमी व ५८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. ४ सेवानिवृत्त झालेले कर्मचारी बाहेरील उमेदवार म्हणून नेमल्यास त्यास सामान्य प्रशासन विभाग/वित्त विभागाची व [illegible] पूर्व मान्यता घेतल्याशिवाय आदेश निर्गमित करण्यात येणार नाही.

वाहनचालक व शिपाई पदावरील बाहेरील उमेदवार नेमताना कार्यक्षमतेच्या दृष्टीने शक्यतो ५० वर्षे वयावरील उमेदवारांची नियुक्ती प्रस्तावित करण्यात येऊ नये. शिपाई पदावरील बाहेरील उमेदवारास या बाबतीत शैक्षणिक अर्हतेची अट बंधनकारक राहणार नाही.

सर्व बाहेरील उमेदवारांची नियुक्ती [illegible] मंत्री/राज्यमंत्री यांच्या कार्यकाळापुरती मर्यादित व तात्पुरत्या स्वरूपाची असेल. त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता व कोणतेही कारण न दाखविता कधीही संपुष्टात आणण्याचा अधिकार शासनास राहील. बाहेरील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत सामावून घेण्याचा हक्क राहणार नाही याची त्यांनी कृपया नोंद घ्यावी.

निमशासकीय संस्था, महामंडळे, स्थानिक संस्था इत्यादि मधील सर्व आस्थापनेवर नियुक्त झालेले उमेदवार म्हणून समजले जाणार नाहीत. त्यांना प्रतिनियुक्तीवर म्हणून त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती वित्त विभागाच्या सल्ल्याने निश्चित केल्या जातील.

बाहेरील उमेदवारातून नियुक्त करण्यात येणाऱ्या स्वीय सहायक, वाहनचालक, शिपाई/संदेशवाहक याना नियुक्तीचे वेळ खालील शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक-स्वसहाय्य-१०९१/५०१९/प्र.क्र.२८०/९१/२१, दि. १२.८.१९९२ मधील तरतूदीनुसार खालीलप्रमाणे वेतन व त्यावर [illegible] विशेष कार्य भत्ता अनुज्ञेय होईल.

१] स्वीय सहायक — रु. १६४०-६०-२६००-७५-२९००+महागाई भत्ता+घरभाडे भत्ता+स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय दराने.

२] वाहनचालक — रु. ९५०-२०-११५०-द.रो.-२५-१५०० +महागाई भत्ता+घरभाडे भत्ता+स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय दराने+ रु. ४२५/- द.म. या दराने.

२

[..3/-

ही पदे पुढे चालू ठेवण्याचा प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह जानेवारी १९९५ च्या अखेरपर्यंत शासनात सादर करण्यात यावा.

५. वरील सर्व पदे ही नियोजन विभागाच्या नियंत्रणाखाली आणि संबंधित विभागीय आयुक्तांच्या आस्थापनेवर तात्पुरती जादा पदे असतील.

६. उपरोक्त पदांवरील जून १९९४ ते डिसेंबर १९९४ अखेरपर्यंतचा वेतन व भत्त्यांवरील होणारा खर्च शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक- वैविमं -१०९४/प्र.६३/का.१४५२, दिनांक- ६ जुलै १९९४ अन्वये राज्यपालांचे सचिव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमातून भागविण्यात यावा. हा खर्च शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक- आकनि-११९४/०३६/अर्थसंकल्प-१५, दिनांक- ६ जुलै १९९४ [संगणक संकेतांक क्र. ८०००-०३६-४] अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या रु. ४०,६२,००० [रुपये चाळीस लाख बासष्ट हजार फक्त] अग्रिमातून प्रथम भागविण्यात यावा व मुख्य लेखाशीर्ष मागणी क्र. "ओ-६-३४५१-सेक्रेटरिएट आर्थिक सेवा-०९०, सेक्रेटरीएट- [दोन] राज्य नियोजन यंत्रणेत वाढ करणे- वैधानिक विकास मंडळे [योजनांतर्गत][भारित]" [संगणक संकेतांक क्र. ३४५१-०४४-९] खालील नोंदविण्यात यावा.

७. उपरोक्त बाबींवरील खर्चासाठी राज्यपालांचे सचिव आणि संबंधित वैधानिक विकास मंडळांचे सदस्य-सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच मंडळाचे सदस्य सचिव हे प्रतिस्वाक्षरी अधिकारी म्हणून काम पाहतील आणि मंडळाच्या कार्यालयातील सह संचालक [अर्थ व सांख्यिकी संचालनालय] हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील.

८. आकस्मिकता निधीतून काढलेल्या सदर रकमेचा परतावा करण्यासाठी व १९९४-९५ च्या आर्थिक वर्षातील उर्वरित कालावधीसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेसाठी, तसेच ही बाब विधी मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी आवश्यक ती पूरक मागणी १९९४-९५ च्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात यावी.

.......४/

९. रक्कम खर्च टाकण्यात आल्यानंतर "आकस्मिकता निधी अग्रीम शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक- आकनि-११९९/०३६/अर्थसंकल्प-१५, दिनांक- ८ जुलै १९९४ अन्वये मंजूर झाला आहे." असे लाल शाईने लिहावे. तसेच अग्रिमाधारे घेतलेली रक्कम प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती वित्त विभागास पाठवावी.

१०. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग [सेवा उपविभाग] यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक- सीआर-८८/५८२/९४/व्यय-३, दिनांक- २५ जुलै १९९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ दि. राजवाहिरे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

[१] राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३५.
[२] राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०० ०३
[३] महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
[४] महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर.
[५] वित्त विभाग [व्यय-३/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१५].
[६] विधानमंडळ विभाग, सचिवालय, मुंबई [का. १४२४].
[७] अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
[८] निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
[९] सामान्य प्रशासन विभाग [२५, १० व २०-अ कार्यासन].
[१०] अपर आयुक्त, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, नागपूर.
[११] अपर आयुक्त, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
[१२] अपर आयुक्त, उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळ, द्वारा:- विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.
[१३] संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
[१४] संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मुंबई.
[१५] विभागीय आयुक्त, नागपूर/औरंगाबाद/कोकण विभाग.
[१६] जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/औरंगाबाद

मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद.
शाखा लेखा

वे सचिव यांचे कार्यालय

77

क्रमांक रा.स./ उ. स. /वैविमं/प्र. क्र.
दैनिक भत्ते इ./९५/
राजभवन ९०५
मलबार हिल, मुंबई ४०० ०३५.

दिनांक २१ जानेवारी, १९९५

प्रति,

सदस्य सचिव,

मराठवाडा वैधानिक विकास मंडळ,

औरंगाबाद.

विषय :- विकास नियोजन विचार बैठकिस उपस्थित राहणाऱ्या अशासकिय सदस्यांना द्यावयाचा प्रवास व दैनिक भत्ता[illegible]

महोदय,

सह-सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ह्यांचे अ.शा.पत्र क्र. वैविमं-१०९४/सीआर-१४०/का-१४५२ दि. १३.१.१९९५ अन्वये मला असे कळविण्यास आदेश आहेत की, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. आर.पी.एस.-१३८८/५६८/एस एस.ई.आर.-१० दि. ३.१०.१९८८ प्रमाणे रू. ५१००/- आणि त्याहून जास्त वेतन असणाऱ्या राज्य शासनाच्या प्रथम दर्जाच्या अधिकाऱ्याप्रमाणे प्रवासभत्ता व दैनिकभत्ता, मंडळाच्या अशासकिय सदस्यांना मंजूर करण्यांत आला आहे. या संदर्भात एक विशेष बाब म्हणून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळे अधिनियम-१९९४ च्या कलम ४[क] प्रमाणे नियुक्त केलेल्या अशासकिय सदस्यांना विकास मंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात विमान प्रवास किंवा रेल्वेच्या वातानुकुलित प्रथम वर्गाने प्रवास करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. यावरिल होणारा खर्च संबंधीत मंडळाच्या मंजूर अनुदानातून भागवावयाचा आहे.

आपला,

[ सुब्रत राथो ]

राज्यपालांचे उप-सचिव,

वैधानिक विकास मंडळे.

# OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA

Raj Bhavan, Malabar Hill, Bombay 400 035, dated 15th May 1995

## Order

No. GSA/G/DB/95/798.—Consequent upon the resignation of Shri Kamal Kishor Kadam, Member and Chairman of the Marathwada Development Board from the membership and chairmanship of the Marathwada Development Board, in exercise of the powers conferred by Clauses 2 and 4 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Order, 1994, referred to as 'the said Order', I, P. C. Alexander, Governor of Maharashtra, hereby appoint Shri Diwakar Rawate as Member [under paragraph (*e*) of sub-clause (1) of the said Order] and Chairman of the Marathwada Development Board.

The term of office of the above member-chairman shall be for a period of two years from the date of publication of this notification in the *Official Gazette*.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Signed) SATISH TRIPATHI,
Secretary to Governor.

असाधारण क्रमांक ४३अ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**
**प्राधिकृत प्रकाशन**

गुरुवार, जुलै ४, १९९६/आषाढ १३, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

## OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA

Raj Bhavan, Mumbai 400 035, dated 5th July 1996.

### Order

No. GSA/DS/DB/96/808.—Whereas the term of office of some members of the three Development Boards appointed *vide* order No. GSA/DB/94/799, dated June 25, 1994 expired on June 24, 1996, in exercise of the powers conferred by clause 4 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra order, 1994 (hereinafter referred to as " the said order ") I, P. C. Alexander, Governor of Maharashtra hereby appoint the following persons to be the members of the Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Development Boards respectively as mentioned below :—

**Vidarbha Development Board**

1. Shri Sudhir Sachhidananda Mungantiwar,
   MLA, Chandrapur, Member under paragraph (*a*) of sub-clause (1) of clause 4 of the said order, in place of Shri Madhukarrao Kimmatkar, MLC.

2. Shri Sham Dube,
   Member of Zilla Parishad, Nagpur, under paragraph (*b*) of sub-clause (1) of clause 4 of the said order, in place of Shri Prakash Patil.

3. Dr. A. K. Shenolikar,
   Under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said order, in place of Dr. S. A. Deshpande.

4. Shri H. B. Ulemale,
   Under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said order.

**Marathwada Development Board**

1. Shri Ravindra Gaikwad, MLA,
   Under paragraph (*a*) of sub-clause (1) of clause 4 of the said order in place of Shri Raibhan Jadhav.

2. Shri Sanjay Kulkarni,
   President, Municipal Council, Umari, District Nanded, under paragraph (*b*) of sub-clause (1) of clause 4 of the said order in place of Shri Jeevanrao Gore.

3. Shri B. A. Kulkarni,
   Under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said order.

4. Shri J. M. Gandhi,
   Under paragraph (*c*) of sub-clause (1) of clause 4 of the said order, in place of Shri G. V. Abhange.

**Development Board for the rest of Maharashtra**

1. Shri Haribhau Jaware,
   President, Zilla Parishad, Jalgaon, under paragraph (*b*) of sub-clause (1) of clause 4 of the said order, in place of Shri Anil Deshmukh.

The term of office of the members of each Board shall be for a period of two years from the date of publication of this notification in the *Official Gazette*.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

Raj Bhavan, Malabar Hill,
Mumbai 400 035.
Dated the 5th July, 1996.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TRIPATHI,
Secretary to the Governor.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

5

147
83

असा. क्र. ९३ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, ऑगस्ट २४, १९९६/भाद्र २, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

**OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA**

Raj Bhavan, Malabar Hill, Mumbai 400 035, dated the 24th August 1996

**Order**

No. GS/DS/DB/96/894.—In exercise of the powers conferred by clause 4 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra, Order, 1994, I, Dr. P. C. Alexander, Governor of Maharashtra, hereby appoint Shri Madhav Vishnu Jog as Member [under paragraph (C) of sub-clause (*1*) of the said Clause] and Chairman of the Development Board for the rest of Maharashtra for a period of two years from the date of publication of this notification in the *Official Gazette*.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

Raj Bhavan, Malabar Hill,
Mumbai 400 035.
Dated the 24th August, 1996

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TRIPATHI,
Secretary to Governor.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

85

असा. क्र. ९३

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, ऑगस्ट २४, १९९६/भाद्र २, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

## OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA

Raj Bhavan, Malabar Hill, Mumbai 400 035, dated the 24th August 1996

**Order**

No. GS/DS/DB/96/894.—In exercise of the powers conferred by clause 4 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra, Order, 1994, I, Dr. P. C. Alexander, Governor of Maharashtra, hereby appoint Shri Madhav Vishnu Jog as Member [under paragraph (C) of sub-clause (*1*) of the said Clause] and Chairman of the Development Board for the rest of Maharashtra for a period of two years from the date of publication of this notification in the *Official Gazette*.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

Raj Bhavan, Malabar Hill,
Mumbai 400 035.
Dated the 24th August, 1996

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TRIPATHI,
Secretary to Governor.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ७ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

779
87

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण
प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जानेवारी २९, १९९८/माघ ९, शके १९१९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)

## OFFICE OF THE SECRETARY TO THE GOVERNOR OF MAHARASHTRA

### Order

THE STATE OF MAHARASHTRA (SPECIAL RESPONSIBILITY OF GOVERNOR FOR VIDARBHA, MARATHWADA AND THE REST OF MAHARASHTRA) ORDER, 1994.

No. GS/SS/DB/98/60.—In exercise of the powers conferred by the State of Maharashtra (Special Responsibility of Governor for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra) Order, 1994 issued by the President of India under Article 371 of the Constitution of India, I. P. C. Alexander, Governor of Maharashtra, hereby make the following Order to amend, the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Order, 1994, as follows, namely :—

1. This Order may be called the Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra (1st Amendment) Order, 1997. 1998.

2. In clause 4 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and rest of Maharashtra Order, 1994, in sub-clause (*1*),—

(*i*) for the words and figures " members not exceeding 7 " the words " the following members " shall be substituted ;

(*ii*) in paragraph (*a*), for the words " One member " the words " Two members " shall be substituted ;

(*iii*) in paragraph (*c*), for the word " Three " the word " Five " shall be substituted ;

(*iv*) in paragraph (*d*), for the letter and word " A Commissioner " the words " All Commissioners " shall be substituted.

Raj Bhavan,
Malabar Hill, Mumbai 400 035.
Dated the 29th January 1998.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VINESH JAIRATH,
Special Secretary to the Governor.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ६अ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

गुरुवार, जानेवारी २९, १९९८/माघ ९, शके १९१९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय

**आदेश**

**महाराष्ट्र राज्य विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची (विशेष जबाबदारी) आदेश, १९९४.**

